पाहणी दौरा | महाप्रबंधकांनी केले आश्वासित; चाळीसगाव स्थानकाचे निरीक्षण

# चाळीसगाव-औरंगाबाद रेल्वे मार्गाबाबत लवकरच बैठक

## काही सुपरफास्ट गाड्यांच्या थाब्यांसाठी दिले संकेत आमदार पाटील, संघटनांनी मांडले समस्यांचे गाऱ्हाणे

प्रतिनिधी । चाळीसगाव

रेल्वेचे महाप्रबंधक (जीएम) देवेंद्रकुमार शर्मा यांच्यासमोर आमदार उन्मेष पाटील यांच्यासह प्रवासी आणि विविध संघटनांनी समस्यांचे गाऱ्हाणे मांडले. महानगरीसह काही सुपरफास्ट गाड्यांना चाळीसगाव रेल्वे स्थानकावर थांबा देण्यासाठी महाप्रबंधकांनी सकारात्मकता दर्शवली. प्रस्तावित चाळीसगाव-औरंगाबाद रेल्वे मार्ग आणि इतर महत्वांच्या विषयांवर खासदार ए.टी.पाटील यांच्या उपस्थितीत बैठक घेण्याचे महाप्रबंधकांनी आमदार पाटील यांना आश्वासित केले. खासदार पाटील यांच्याशी त्यांनी फोनवर संपर्क साधला.

मनमाड, नांदगाव, न्यायडोंगरी, हिरापूर रेल्वे स्थानकाचे निरीक्षण करुन महाप्रबंधक चाळीसगावात आले. स्टेशन अधीक्षक एन. पी. बडगुजर यांनी महाप्रबंधकाचे स्वागत करुन स्टेशन परिसरातील सुविधांची माहिती दिली. त्यांच्या सोबत डीआरएम आर. के.यादव व भुसावळ, मुंबई येथील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. चाळीसगाव रेल्वे स्थानकावर जीएम शनिवारी दुपारी १२ वाजता पोहचले. त्यांनी रेल्वे स्थानकावर प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सोयी सुविधांची पाहणी केली. त्यानंतर रेल्वे स्थानकातील रेल्वेच्या वेल्डिंग कारखान्याला भेट देत कामकाजाची माहिती घेतली. हा कारखाना खासगी तत्वातून सुरू असून तीन शिफ्टमध्ये मोठे जनरेटर लाऊन कामकाज केले जात आहे. तेथे उच्चदाबाचे वीज कनेक्शन देण्याचे निर्देश महाप्रबंधकांनी दिले. रेल्वे स्थानकाजवळील चोरटे मार्ग कायम बंद ठेवा. कायमस्वरुपी स्वच्छता ठेवा. रेल्वे स्थानकाच्या आतील व बाहेरील उद्यान आणखी सुशोभित करा.

तसेच सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासंदर्भात त्यांनी सूचना दिल्या. शहर व तालुक्यातील अधिकाऱ्यांशी विविध समस्यांबाबत चर्चा केली. तसेच महाप्रबंधक येणार असल्याने स्थानिक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी रेल्वे स्थानक आणि बाहेरील परिसरात साफसफाईच्या कामी विशेष लक्ष दिलेले होते.



चाळीसगाव येथे रेल्वेचे महाप्रबंधक देवेंद्रकुमार शर्मा यांच्याशी चर्चा करताना आमदार उन्मेष पाटील. सोबत स्टेशन अधीक्षक एन. पी. बडगुजर, डीआरएम आर.के.यादव आदी अधिकारी, पदाधिकारी.

## आमदारांसोबत झाली बैठक

आमदार उन्मेष पाटील, महाप्रबंधक शर्मा, डीआरएम यादव यांची बैठक झाली. यात आमदार पाटील यांनी महाप्रबंधकांना निवेदन दिले. त्यातील मागण्या अशा : प्लॅटफार्मवरील शेड वाढवण्यात यावे, पादचारी पूल व भुयारी मार्ग करण्यात यावा, काही सुपरफास्ट गाड्यांना थांबा देण्यात यावा, चाळीसगाव - नागद - बनोटी- सोयगाव फर्दापूर- बुलढाणा-खामगाव-अकोला या नवीन रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण करण्यात यावे, आयआरसीटीसी सेवेच्या कक्षेत चाळीसगावचा समावेश करण्यात यावा. या चर्चेत नगरसेवक संजय रतनसिंग पाटील, घृष्णेश्वर पाटील, नितीन पाटील, चंद्रकांत तायडे, रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी व रेल्वे प्रवाशी संघटनांचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

## रयत सेनेचेही निवेदन

चाळीसगाव स्थानकावर महानगरी, गोवा एक्स्प्रेससह इतर जलद गाड्यांना थांबा द्यावा. प्रवाशांना इतर सुविधा निर्माण करुन द्याव्यात, या मागणीसाठी रयत सेनेने महाव्यवस्थापक शर्मा यांची भेट घेऊन निवेदन दिले. धुळे ते चाळीसगाव, कल्याण-पुणे रेल्वे गाडी सुरू करावी, अशी मागणी रयत सेनेने केली आहे. निवेदन देताना रयत सेनेचे संस्थापक अध्यक्ष गणेश पवार, जिल्हाध्यक्ष संजय कापसे, समन्वयक पी. एन. पाटील, तालुका कार्याध्यक्ष दत्तू पवार, तालुका उपाध्यक्ष मुकुंद पवार, भरत नवले, विशाल सपकाळ, संजय वानखेडे, संजय नवले, अनिल पाटील, विलास मराठे, सतीश पवार, बाळासाहेब पवार, रमेश पवार. कल्पेश पवार आदी उपस्थित होते.

## पाचोऱ्यातील रेल्वे स्थानक परिसरातील सुविधांची घेतली माहिती

महाप्रबंधक शर्मा यांनी पाचोरा रेल्वे स्थानकाचेही निरीक्षण केले. या पाहणीत त्यांनी रेल्वे स्टेशन परिसरात सुविधा निर्माण करण्याचे निर्देश दिले. प्रवाशांसाठी आसन व्यवस्था, रेल्वे कर्मचारी निवासस्थानी मिळणाऱ्या सुविधांबाबत महाप्रबंधकांनी विचारणा केली. त्यांच्याहस्ते बालोद्यानात वृक्षारोपण झाले. त्यांनी अधीक्षकांच्या कॅबीनमध्ये पत्रकार, प्रवासी संघटना, पदाधिकारी व राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. पाचोरा रेल्वे स्थानकावर जनता व प्रवासी संघटनेकडून प्रवासी सुविधा, विविध एक्स्प्रेसचे थांबे मिळावेत, आदी मागण्यांचे निवेदन प्रवासी संघटनेच्यावतीने देण्यात आले.